# मिरा भाईंदर महानगरपालिका

**सामान्य प्रशासन विभाग**

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in


जा.क्र. मनपा/सा.प्र./१६२/२०२६-२७ दि.१७/७/२०२६

**कार्यालयीन आदेश**

**विषय :-** दि.२५ जुलै २०२६ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काशी जरोमरी तलाव व नवघर नवीन तलाव येथील श्री विठ्ठल मुर्ती जवळ कार्यक्रम आयोजीत करणेबाबत.

**संदर्भ :-** जा.क्र./मनपा/महापौर/१५१/२०२६-२७ यांचेकडील दि.०८/०७/२०२६ रोजीचे पत्र

शनिवार, दि. २५ जुलै २०२६ रोजी आषाढी एकादशी निमित्त मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील काशीगांव जरीमरी तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती व नवघर नवीन तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती येथे कार्यक्रम सोहळा आयोजीत करण्यात आलेला आहे.

सदर काशीगांव जरीमरी तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती व नवघर नवीन तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती यांचा कार्यक्रम सोहळा राजशिष्टाचाराचे पालन करून सदर कार्यक्रम सुनियोजितरित्या पार पाडणेकरीता खालीलप्रमाणे अधिकारी यांची नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र | अधिकारी/ कर्मचारी | कामाचे स्वरूप |
|---|---|---|
| १. | श्री. दिपक खांबीत<br>प्र.शहर अभियंता<br><br>श्री. नितीन मुकणे<br>कार्यकारी अभियंता. | • आषाढी एकादशी निमित्त काशीगांव जरीमरी तलाव व नवघर नवीन तलाव येथे उभारण्यात आलेल्या भव्य-दिव्य अशी उंचीची श्री विठ्ठल मूर्ती ठिकाणी पुजा, अभिषेक, आरती तसेच अन्य सर्व आवश्यक धार्मिक सोपस्कार परंपरेनुसार नियोजन करणे.<br>• आषाढी एकादशी निमित्त काशीगांव येथील जरीमरी तलाव व नवघर नवीन तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती जवळील परिसरात रोषणाई, सजावट व सुशोभिकरण करणे.<br>• दोन्ही कार्यक्रमाच्या ठिकाणी वादन व इतर कार्यक्रमाकरीता ध्वनीक्षेपण यंत्रणेची स्टेज व्यवस्था, लाईट, साऊंड सिस्टीम, स्पिकर्स व माईक यांची आवश्यतेप्रमाणे व्यवस्था करण्यात यावी. तसेच कार्यक्रमावर संपूर्ण नियंत्रण ठेवणे.<br>• दोन्ही कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थीत नागरीक, महिला व दिव्यांग व्यक्ती इ. करीता बसण्याची आसन व्यवस्था करणे.<br>• दोन्ही कार्यक्रमाच्या ठिकाणी रत्यावरील खड्डे भरणे व गटारावरील झाकणे बसविणे. |

| | | |
|---|---|---|
| | | • पोलिस अधिकारी यांचेशी समन्वय साधुन नागरिकांच्या येण्याजाण्याकरिता मार्ग ठरविणे.<br>• पुजेकरीता भटजींची व्यवस्था करणे.<br>• दोन्ही ठिकाणी रांगोळीची व्यवस्था करण्यात यावी. |
| २. | श्री. प्रकाश बोराडे<br>प्र.मुख्य अग्निशमन अधिकारी<br><br>श्री. अल्पेश संखे<br>अग्निशमन केंद्र अधिकारी | • आषाढी एकादशी निमित्त काशीगांव येथील जरीमरी तलाव व नवघर नवीन तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती जवळील परिसर आपल्या विभागामार्फत स्वच्छ धुवून घेण्यात यावा.<br>• अग्निशमन विभागाची हायड्रोलीक शीडी त्यांच्या चालकासह नमुद ठिकाणी न चुकता तयार ठेवावी. याबाबत संबंधित विभागाच्या अधिनस्त अधिका-यांना आदेश देवून कार्यवाही करावी. नियोजित कार्यक्रमामध्ये बाधा येणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी.<br>• दोन्ही कार्यक्रमाच्या ठिकाणी सर्व नागरीकांकरीता आपल्या कडुन अग्निसुरक्षा व्यवस्था करण्यात यावी. |
| ३. | श्री. शरद नानेगावकर<br>कार्यकारी अभियंता, | • आषाढी एकादशी निमित्त काशीगांव जरीमरी तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती कार्यक्रम ठिकाणी उपस्थीत नागरीक, महिला व दिव्यांग व्यक्ती इ. करीता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे.<br>• आषाढी एकादशी निमित्त नवघर नवीन तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती कार्यक्रम ठिकाणी उपस्थीत नागरीक, महिला व दिव्यांग व्यक्ती इ. करीता पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे. |
| ४. | श्री. नागेश विरकर<br>मुख्य उद्यान अधिक्षक | • आषाढी एकादशी निमित्त काशीगांव जरीमरी तलाव व नवघर नवीन तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती जवळील परिसर धुवून साफ करावेत. तसेच आजू बाजूच्या परिसरात साफ सफाई करावी.<br>• आषाढी एकादशी निमित्त काशीगांव जरीमरी तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती व नवघर नवीन तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती ठिकाणी मोठे पुष्पहार, श्रीफळ व फुलांची व्यवस्था करणे.<br>• आषाढी एकादशी निमित्त नवघर नवीन तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती कार्यक्रम सोहळा ठिकाणी मोठे पुष्पहार, श्रीफळ व फुलांची व्यवस्था करणे. |
| ५. | श्री. राजकुमार घरत<br>सिस्टीम मॅनेजर | • आषाढी एकादशी निमित्त काशीगांव येथील जरीमरी तलाव व नवघर नवीन तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती फोटोग्राफी व ड्रोन व्हिडीओ शुटिंग करणेकरीता फोटोग्राफर उपलब्ध |

| | | |
|---|---|---|
| | | करणे व सदर कार्यक्रमाचे परिपत्रक मा. संपादक, पत्रकार,इ ना वाटप करण्याचे काम करण्यात यावे.<br>• काशीगांव येथील जरीमरी तलाव व नवघर नवीन तलाव कार्यक्रमाचे परिपत्रक महानगरपालिकेच्या वेबसाईट, सोशल मिडीया तसेच नोटीस बोर्डावर व्यापक प्रमाणात प्रसिध्दी देणे. |
| ६. | श्री. सुनिल यादव,<br>सहा. आयुक्त,<br>`आस्थापना विभाग | • मा.जिल्हाधिकारी, पोलिस विभाग यांना निमंत्रण देणे.<br>• मा.पदाधिकारी,मा.नगरसेवक/ नगरसेविका व प्रतिष्ठीत नागरीक यांना कार्यक्रमाकरीता निमंत्रीत करणे.<br>• दोन्ही कार्यक्रम ठिकाणी सुर्राक्षततेच्या दृष्टीने सुरक्षा रक्षक कर्मचारी यांना उपस्थित राहणे करीता आदेशित करावे.<br>• सुरक्षतेच्या दृष्टीने कायदा व सुव्यवस्था राखणेकरीता पोलिस बंदोबस्त मिळणेकरीता मा.पोलिस आयुक्त संबंधित परिसरातील पोलिस स्टेशन व ट्रॉफिक नियंत्रणाकरीता संबधित पोलिस अधिकारी यांना पत्रव्यवहार करणे.<br>• राजशिष्टाचाराविषयक बाबींचे अनुपालन होईल याबाबत दक्षता घेणे. |
| ७. | श्री. दिनेश कानगुडे,<br>सहा.आयुक्त, परिवहन विभाग | • आषाढी एकादशी निमित्त काशीगांव जरीमरी तलाव येथील व नवघर नवीन तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती जवळील कार्यक्रम ठिकाणी नागरीक, महिला, दिव्यांग व्यक्ती व जेष्ठ वृध नागरीक इत्यादीना आवश्यकतेनुसार पोहचविणेकरीता मनपाच्या परिवहन बसेसची व्यवस्था करणे.<br>• शहरातील मा.पदाधिकारी,मा.नगरसेवक/ नगरसेविका व प्रतिष्ठीत नागरीक यांना कार्यक्रमाकरीता निमंत्रीत करणे. |
| ८. | श्री. योगेश गुणिजन<br>सहा. आयुक्त तथा<br>प्रभाग अधिकारी क्र. ४<br><br>श्री. अरविंद चाळके,<br>प्र.उप.मुख्य स्वच्छता अधिकारी<br>श्री. योगेश गुणिजन | • आषाढी एकादशी निमित्त काशीगांव येथील जरीमरी तलाव व नवघर नवीन तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती जवळील परिसरात स्वच्छता व साफसफाई ठेवण्यात यावी. याकरीता संबधित स्वच्छता निरिक्षक व अधिनस्त कर्मचारी यांची नेमणुक करण्यात यावी. साफसफाई व स्वच्छता राहील याची दक्षता घ्यावी.<br>• दोन्ही कार्यक्रम ठिकाणी जवळील स्वच्छतागृह यांची साफ सफाई बाबत दक्षता घ्यावी. |

| | | |
|---|---|---|
| | | • काशीगांव येथील जरीमरी तलाव व नवघर नवीन तलाव या दोन्ही ठिकाणातील श्री विठ्ठल मूर्ती परिसरातील हार-फुले इत्यादी निर्माल्य संकलनाकरीता कर्मचारी यांची नेमणूक करावी. तसेच सदर निर्माल्याची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावणे. |
| ९. | डॉ. नंदकिशोर लहाने<br>मुख्य वैद्यकीय आरोग्य अधिकारी | • आषाढी एकादशी निमित्त काशीगांव येथील जरीमरी तलाव व नवघर नवीन तलाव या दोन्ही ठिकाणातील श्री विठ्ठल मूर्ती जवळ डॉक्टर, परिचारीका व रुग्णवाहिका यांची व्यवस्था करण्यात यावी. याबाबत हलगर्जीपणा होणार नाही याची सर्वतोपरी दक्षता घ्यावी. |
| १०. | श्री. दत्तात्रेय वरकुटे<br>सहा. आयुक्त, अतिक्रमण निर्मुलन<br><br>श्री. जितेंद्र कांबळे<br>सहा. आयुक्त तथा प्रभाग अधिकारी क्र. ३<br><br>श्री. भरत सोनारे<br>सहा. आयुक्त तथा प्रभाग अधिकारी क्र. ६ | • आषाढी एकादशी निमित्त काशीगांव येथील जरीमरी तलाव व नवघर नवीन तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती कार्यक्रमाच्या ठिकाणी असलेली बेवारस वाहने व बाधा होईल अशा फेरीवाल्यांना हटविणे.<br>• तसेच सदर कार्यक्रमाच्या आजुबाजुच्या परिसरातील अनधिकृत बोर्ड-बॅनर्स, होर्डींग काढणे व परिसर स्वच्छ ठेवणे. |
| ११. | श्रीम. चारुशिला खरपडे,<br>महिला व बालकल्याण अधिकारी | • आषाढी एकादशी निमित्त काशीगांव येथील जरीमरी तलाव व नवघर नवीन तलाव येथील श्री विठ्ठल मूर्ती कार्यक्रमाच्या ठिकाणी सर्व नागरिकांसाठी खिचडीची व्यवस्था करावी. |

वरील प्रमाणे नमुद आदेशातील कामे संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्याने वेळेत पुर्ण करून सदर आदेशाचे तंतोतंत पालन करावे व सोपविलेले कामकाजांची जबाबदारी पार पाडावी अन्यथा आपणांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

17/07/26

**(सचिन बांगर)**
**उपायुक्त(मुख्यालय)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने**

**प्रत माहितीस्तव :**

१) मा.आयुक्त महोदय, मि.भा.मनपा
२) मा.अतिरिक्त आयुक्त (सर्व), मि.भा.मनपा
३) उपायुक्त (सर्व), मि.भा.मनपा